**<u>ठळक बातम्या</u>**

- पाच देशांच्या दौऱ्यादरम्यान आज प्रधानमंत्री स्वीडनला जाणार / महत्त्वाच्या विषयांवर करणार चर्चा

- चांदीच्या आयातीवर निर्बंध लागू

- जनगणना प्रक्रीयेत महाराष्ट्रात ११ लाख १४ हजार २७७ घरांची स्वगणना पूर्ण

- नीट परीक्षा पेपरफुटीप्रकरणी आरोपी मनिषा मांढरेला १४ दिवसांची सीबीआय कोठडी

आणि

- थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुषांच्या दुहेरी गटात भारताला उपविजेतेपद

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सध्या पाच देशांच्या दौऱ्यावर असून, ते आज स्वीडन इथं भेट देतील. त्यांच्या दौऱ्याचा हा तिसरा टप्पा आहे. प्रधानमंत्र्यांच्या या दौऱ्याची आतापर्यंतची संक्षिप्त माहिती आमच्या प्रतिनिधीकडून …

**--- होल्ड - व्हीसी--**

*(प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज गुटेनबर्ग इथं स्वीडीश प्रधानमंत्री उल्फ क्रिस्टर्सन यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करतील. व्यापार, हरित स्थित्यंतर, कृत्रिम बुद्धिमत्ता, नवोन्मेष, संरक्षण, अंतराळ इत्यादी क्षेत्रात सहकार्य वाढवण्याबाबत यावेळी चर्चा होईल. युरोपीयन कमिशनच्या अध्यक्ष उर्सुला वॉन डेर लेयेन यांच्याबरोबर उभय नेते युरोपीय गोलमेज परिषदेलाही संबोधित करतील.*

*स्वीडननंतर प्रधानमंत्री नॉर्वे आणि जर्मनीला भेट देणार आहेत.*

*भारत- युरोपीय संघ मुक्त व्यापार करार झाल्यानंतर प्रधानमंत्र्यांचा हा पहिलाच युरोप दौरा आहे. त्यांच्या नेदरलँड भेटीत महत्त्वाचे १७ करार झाले. सेमीकंडक्टर, दुर्मीळ खनिजं, हरित हायड्रोजन, उच्च शिक्षण, सायबर सुरक्षा, शेती, दुग्धव्यवसाय, आरोग्य, पाणी व्यवस्थापन इत्यादी क्षेत्रांचा यात समावेश आहे. यावेळी दोन्ही देशांमध्ये व्हीसा प्रक्रीया सुलभ*

*करण्यावर सहमती झाली. दहशतवादाविरोधात संघटित प्रतिकार करण्याबाबत उभय नेत्यांचं एकमत झालं.*

*याखेरीज नेदरलँड्समधे लायडन विद्यापीठात जतन केलेला चोलकालीन अण्णाईमंगलम ताम्रपट मोदी यांना सुपूर्द करण्यात आला.*

*त्या आधी प्रधानमंत्री मोदी यांनी संयुक्त अरब अमिरातीत अबू धाबी इथं राष्ट्राध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायेद अल नाहयान यांच्याशी चर्चा केली. तिथंही दोन्ही देशांदरम्यान महत्त्वाचे व्यापारी करार झाले.)*

**<><><><>**

दिल्लीत सीएनजी पुरवठा करणाऱ्या इंद्रप्रस्थ गॅस लिमिटेडने आजपासून एक रुपया दरवाढ  केली आहे. यानुसार सीएनजीचे दर दिल्लीत ८० रुपये ९ पैसे, गाजियाबाद आणि नोएडा इथं ८८ रुपये ७० पैसे, गुरूग्राममधे ८५ रुपये १२ पैसे इतके झाले. या आठवड्याच्या सुरुवातीला सीएनजीच्या दरात इंद्रप्रस्थ गॅस लिमिटेडने २ पैशांची वाढ केली होती.

**<><><><>**

चांदीच्या आयातीवर सरकारने निर्बंध घातले आहेत. सोन्याचा किंवा प्लॅटिनमचा मुलामा लावलेल्या चांदीच्या आयातीवरही निर्बंध लावल्याचं परकीय व्यापार महासंचालनालयानं अधिसूचनेद्वारे सांगितलं. याआधी सरकारने १३ एप्रिल रोजी मौल्यवान धातूंवरचं आयात शुल्क ६ टक्क्यावरून १५ टक्क्यापर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला होता.

**<><><><>**

जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्यात गृहगणना सुरू झाली असून, सरकारने त्यासाठी स्वगणनेचा पर्याय दिला होता. या अंतर्गत महाराष्ट्रात  १ ते १५ मे या कालावधीत ११ लाख १४ हजार २७७ घरांनी स्व-गणनेची प्रक्रिया यशस्वीपणे  पूर्ण केली.

ज्या कुटुंबांनी स्व-गणना प्रक्रिया पूर्ण केली आहे, त्यांनी  आपल्या  भागात येणाऱ्या प्रगणकाला  “H” या अक्षराने सुरू होणारा 11 अंकी स्व-गणना ओळखक्रमांक उपलब्ध करून द्यावा. तसंच ज्यांना ऑनलाइन प्रक्रिया पूर्ण करता आली नाही, त्यांनी १६ मे ते  १४ जून २०२६ या कालावधीत राज्यातल्या सर्व कुटुंबांना प्रत्यक्ष गणनेसाठी प्रगणक भेट देतील. त्यावेळी त्यांना सहकार्य करावं आणि अचूक माहिती द्यावी, असं आवाहन निवडणूक आयोगानं केलं आहे.

<><><><>

'एक देश एक निवडणूक' या विधेयकासाठीच्या संयुक्त संसदीय समितीने काल बंगळुरूमध्ये राजकीय पक्ष, कायदेतज्ञ आणि नागरी समाजातल्या प्रतिनिधींशी सविस्तर चर्चा केली. कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार, माजी मुख्यमंत्री वीरप्पा मोइली आणि सर्व पक्षीय प्रतिनिधींनी, या विधेयकावर आपले विचार मांडले अशी माहिती समितीचे अध्यक्ष पी. पी. चौधरी यांनी दिली. संयुक्त संसदीय समिती विविध राज्यांचे दौरे करुन त्यांच्या हरकती आणि सूचनांची नोंद घेत असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><>

तिरुवनंतपूरम इथून दिल्लीला जाणाऱ्या राजधानी एक्स्प्रेसच्या वातानुकूलित डब्याला लागलेल्या आगीमुळे मुंबई-दिल्ली रेल्वे मार्गावरची वाहतूक विस्कळीत झाली आहे. मध्य प्रदेशमधल्या रतलाम जिल्ह्यात आज पहाटे सव्वा पाचच्या सुमाराला या गाडीच्या बी- वन या डब्याला आग लागली तेव्हा डब्यात ६८ प्रवासी होते. मात्र १५ मिनिटांच्या आत सर्व प्रवाशांची सुटका करण्यात आली असून कुठलीही जीवितहानी झालेली नाही, अशी माहिती रेल्वे अधिकाऱ्यांनी दिली आहे. या घटनेमुळे ८ ते १० प्रवासी गाड्यांच्या वाहतुकीवर परिणाम झाला असून ओव्हरहेड दुरुस्तीचं काम युद्धपातळीवर सुरू असल्याचं अधिकाऱ्यांनी सांगितलं.

<><><><>

नीट प्रवेश परीक्षा २०२६चे पेपर फुटल्याप्रकरणी आरोपी मनिषा मांढरेला दिल्लीच्या राऊज अवेन्यू न्यायालयाने १४ दिवसांची सीबीआय कोठडी दिली आहे. या प्रकरणाचा तपास सीबीआयने सुरु केल्यानंतर पुण्यातून आरोपीला काल अटक केली होती.

<><><><>

आज 'वर्ल्ड हायपर-टेन्शन डे', म्हणजेच, जागतिक उच्च रक्तदाब दिवस साजरा होत आहे. उच्च रक्तदाबाविषयी जागृती निर्माण करणं, रक्तदाब प्रतिबंध, निदान आणि नियंत्रणासाठी वैयक्तिक, सामूहिक आणि आरोग्य यंत्रणा स्तरावर प्रयत्नांना चालना देणं, हे या दिवसाचं उद्दिष्ट आहे. 'रक्तदाबावर एकत्रितपणे नियंत्रण मिळवू: आपला रक्तदाब नियमितपणे तपासा, या सूप्त मारेकऱ्याला पराभूत करा', ही यंदाची या दिवसाची संकल्पना आहे.

<><><><>

जागतिक दूरसंचार आणि माहिती संघटन दिवस आज साजरा होत आहे. पॅरीस मध्ये १८६५ मध्ये आजच्या दिवशी‘ आयटीयू’, अर्थात आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघाची स्थापना झाली, त्या निमित्त हा दिवस साजरा होतो. इंटरनेट आणि इतर माहिती आणि दूरसंवाद तंत्रज्ञानामुळे समाज आणि अर्थव्यवस्थेत  घडणाऱ्या बदलांबद्दल जागरुकता निर्माण करणं हे याचं उद्दिष्ट आहे.

<><><><><>

थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष दुहेरी गटात भारताच्या सात्विक साईराज रांकी रेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीला उपविजेतेपदावर समाधान मानावं लागलं. इंडोनेशियाच्या लिओ रोली कार्नांडो आणि डॅनियल मार्टिन या जोडीनं त्यांचा २१ - १२, २५- २३ असा पराभव केला.

<><><><><>

आयपीएल क्रिकेटमधे काल ईडन गार्डन्स मैदानावर कोलकाता नाईट रायडर्सने गुजरात टायटन्सचा २९ धावांनी पराभव केला.  त्यामुळे गुजरात टायटन्सच्या संघाची ‘प्ले ऑफ’ मधल्या प्रवेशाची संधी हुकली.  सुनील नरिने सामनावीर ठरला.

आज धरमशाला इथं दुपारी साडेतीन वाजता पंजाब किंग्जचा सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूबरोबर होईल. दुसरा सामना दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडीयमवर दिल्ली कॅपिटल्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात संध्याकाळी साडेसात वाजता होईल.

<><><><><>

इटालीयन खुल्या टेनिस स्पर्धेच्या काल झालेल्या अंतिम सामन्यात अमेरिकेच्या कोको गॉफचा पराभव करत युक्रेनच्या एलिना स्वितोलिना हिने स्पर्धेचं विजेतेपद पटकावलं. स्वितोलिनाने कोको गॉफचा ६-४, ६-७, ६-२ असा पराभव केला. स्वितोलिनाने तिसऱ्यांदा इटालीयन खुल्या टेनिस स्पर्धेत विजय मिळवला आहे.

पुरूष एकेरीत इटलीच्या यानिक सिनरने रशियाच्या दानिल मेदवेदेव याचा काल उपांत्य फेरीत ६-२, ५-७, ६-४ असा पराभव करत अंतिम फेरीत  प्रवेश केला. अंतिम फेरीत सिनरचा सामना आज कॅस्पर रूड याच्याशी होणार आहे.

<><><><><>

टेनिसमधे पोर्तुगाल एटीपी चॅलेंजर स्पर्धेत भारताच्या सिद्धांत बांठियानं बुल्गेरियाच्या अलेक्झांडर डोन्स्कीच्या साथीनं दुहेरीचं विजेतेपद पटकावलं. पोर्तुगालचा टियागो परेरा आणि स्पेनचा डेविड वेगा हर्नांडेझ या जोडीला त्यांनी ६-३, ६-२ असं सरळ सेटमधे हरवलं. सिद्धांत बांठियाचं एटीपी चॅलेंजरमधलं हे तिसरं विजेतेपद आहे.

**<><><><><>**

आफ्रिकेत काँगो आणि युगांडामधला ‘इबोला’ या आजाराचा उद्रेक, ही 'आंतरराष्ट्रीय चिंतेची आणि सार्वजनिक आरोग्य विषयक आणीबाणी' असल्याचं डब्ल्यू. एच. ओ., अर्थात जागतिक आरोग्य संघटनेनं  घोषित केलं आहे. ‘इबोला’ या आजाराचे आतापर्यंत ३०० पेक्षा जास्त संशयित रुग्ण, तर ८८ जणांच्या मृत्यूंची नोंद झाली. या पार्श्वभूमीवर, डब्ल्यू.एच.ओ. चे महासंचालक टेड्रोस घेब्रेयसस यांनी आज हे घोषित केलं. मात्र ‘इबोला’ चा उद्रेक अद्याप कोविड-१९ मुळे निर्माण झालेल्या जागतिक आणीबाणीचे निकष पूर्ण करत नसून, आंतरराष्ट्रीय सीमा बंद करण्याची आवश्यकता नसल्याचं डब्ल्यू. एच. ओ. नं समाजमाध्यमावर म्हटलं आहे.

**<><><><><>**

नैऋत्य मोसमी वाऱ्यांनी अरबी समुद्र, बंगालचा उपसागर, अंदमान समुद्राचा मोठा भाग, अंदमान द्वीपसमूह आणि संपूर्ण निकोबार बेटांच्या काही भागांमध्ये आगेकूच केली आहे. त्यानुसार या महिन्याच्या २६ तारखेला केरळमध्ये मोसमी पाऊस  दाखल होण्याची शक्यता आहे.

येत्या तीन ते चार दिवसांत अंदमान आणि निकोबार बेटं, पश्चिम बंगालचं  हिमालयीन क्षेत्र, सिक्कीम, तामिळनाडू, पुदुचेरी, काराईकल, केरळ तसच मध्य आणि दक्षिण कर्नाटकच्या काही भागात जोरदार ते अतिजोरदार पावसाचा अंदाज भारतीय हवामान विभागानं वर्तवला आहे. त्यानंतर पुढल्या दोन दिवसांत बिहार, छत्तीसगढ, झारखंड, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, ओदिशा, रायलसीमा, आंध्र प्रदेशचा किनारी भाग, कोकण, गोवा, तेलंगणा, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड या भागांत तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ  आणि सोसाट्याचा वारा वाहील असा  अंदाज आहे. मध्य प्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश आणि विदर्भ या भागांत उद्या उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**//<><><><><>//**